महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/मान्यता/२०२५-२६/4540
दिनांक : .११.२०२४ 13 NOV 2024

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व विद्यमान/प्रस्तावित नवीन पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान संस्थेतील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद या शिखर संस्थांच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत...**

**संदर्भ** :- १. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिताच्या मान्यता प्रक्रिये संदर्भातील अधिसूचना /जाहिर सूचना/ परिपत्रके
२. संचालनालयाचे पत्र क्र.०२/एनजीपी/मान्यता/एआयसीटीई/२०२५/३९५ दि.१२.११.२०२४

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी अधिसूचना /जाहीर सूचना/ परिपत्रकाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती,मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिध्द केले आहे व त्या संबंधीचे Approval Process Handbook प्रसिध्द केले आहे. या शिखर परिषदांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या संस्थांतील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र / शासन मान्यतेकरिता खालीलप्रमाणे प्रस्ताव या विभागीय कार्यालयाकडे सादर करण्यात यावे.

**अ) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या अभ्यासक्रम/संस्थाकरिता**

| अ.क्र. | अर्जाचा प्रकार |
|---|---|
| १ | नविन तांत्रिक संस्था सुरु (Setting up a new Technical Institute) |
| २ | संस्था बंद करुन तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे. (Institution applied for Closure of the Institution for starting of a new Technical Institution in the same premises in the same year) |
| ३ | पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे. (Conversion of Diploma Level into Degree Level and Vice-versa) |
| ४ | विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) /स्तर (Level) सुरु करणे. (To start New Programme/ Level in the existing Institutions |
| ५ | साईट/लोकेशन मध्ये बदल करणे (Change of Site /Location) |
| ६ | संस्था बंद करणे (Closure of the Institution) |
| ७ | महिला संस्थेचे को-एज्यकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट (Conversion of Women's Institution into Co-ed Institution and Vice-versa) |
| ८ | ट्रस्ट/सोसायटी/कंपीनच्या नावात/पत्यात बदल करणे (Change in the Name/ Address of the Trust/Society/Company) |

कृ.मा.प.

विद्यमान अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थांच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था संदर्भीय अधिसूचना/जाहीर सूचना/ परिपत्रकानुसार अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाची मान्यता/शासनाचे ना-हकरत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव **दि.२२.०२.२०१८** च्या शासन निर्णयान्वये निर्धारित केलेले नोंदणी शुल्क धनाकर्ष (डी.डी.) व्दारे SBI A/C GRAS या नावे भरावा. नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह तात्काळ प्रस्ताव या विभागीय कार्यालयाकडे जमा करावा. तसचे उपरोक्त नमूद ८ बाबींव्यतिरिक्त इतर प्रकरणी (उदा. प्रवेश क्षमता वाढ/ घट,कोर्स च्या नावात बदल इत्यादी) **दि.२२.०२.२०१८** रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्धारित केलेले नोदणी शुल्क या विभागीय कार्यालयाकडे भरणा करुन प्रस्ताव सादर करावा.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सद्यःस्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थांनी आपले प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडे सादर करावेत. तसेच शासनाची मान्यता/ शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाची राहील यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता